क्रमांक:- निर्लेखन-२०२०/प्र.क्र.९३/का.२४

सामान्य प्रशासन विभाग/का.२४

दिनांक :-२३ डिसेंबर २०२०

निर्लेखित संगणक ,प्रिंटर्स व स्कॅनर,माऊस,की बोर्ड ,वायर, टोनर , कपाट इ. विक्रीबाबत नियम, अटी व शर्ती.

१. या विभागातील निर्लेखित केलेले **संगणक** ,**प्रिंटर्स , स्कॅनर,माऊस,की बोर्ड ,वायर, टोनर,लोखंडी कपाट झेरॉक्स मशिन, दुरध्वनी, दुरध्वनी मशिन इ.** निविदा पध्दतीने **जेथे आहे व जसे आहे तसे** विक्री करणे आहे. सदर वस्तुंमध्ये साधरणत: प्रिंटर्स ,स्कॅनर,माऊस,की बोर्ड ,वायर, टोनर,लोखंडी कपाट, झेरॉक्स मशिन, दुरध्वनी, दुरध्वनी मशिन इ वस्तुंचा समावेश आहे.

२. उपरोक्त वस्तु सामान्य प्रशासन विभाग, ७ वा मजला,विस्तार इमारत ,मंत्रालय,मुंबई येथे ( **दिनांक २३ डिसेंबर २०२० ते दि.३१ डिसेंबर २०२० या कालावधीत ) दिनांक ३० डिसेंबर २०२० या दिवशी दुपारी २.३० ते ४.०० या वेळेत पहाण्यासाठी उपलब्ध आहेत.**

३. ज्या इच्छुक खरेदीदारास सदर साहित्य खरेदी करावयाचे आहे, त्यांनी सदर साहित्याची प्रत्यक्ष पहाणी करुन त्याबाबतचे खरेदी करावयाचे निविदेचे दर निविदा फार्ममध्ये नमुद करुन बंद लिफाप्यात या निविदा सूचनेच्या **दिनांक ३१ डिसेंबर २०२० दुपारी २.३० ते ४.००** या वेळेत समक्ष सादर करावेत. त्यांनतर आलेल्या तसेच पोष्टाने आलेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाहीत. यास्तव **निविदा कक्ष अधिकारी (का.२४) सामान्य प्रशासन विभाग,६ वा मजला,दालन क्रमांक ६१२ ,मंत्रालय विस्तार इमारत, मादाम कामा मार्ग ,हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई-४०००३२ या कार्यालयात पोहोचविण्याची जबाबदारी संबधित निविदाधारकाची राहील**,याबाबत तक्रार चालणार नाही.

४. अनामत रक्कम रुपये ५००/- ( ना परतावा) कक्ष अधिकारी,रोख् शाखा,सामान्य प्रशासन विभाग,तिसरा मजला,मुख्य इमारत, मादाम कामा मार्ग ,हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई-४०००३२ यांच्याकडे जमा करावी.

५. सदर विक्री ही निविदा पध्दतीने करण्यात येणार असल्याने बंद लिफाप्यावर " **निर्लेखित संगणक, प्रिंटर्स व स्कॅनर इ.खरेदीसाठी निविदा** " असे स्पष्ट नमुद करुन निविदा फार्मनुसार वस्तु खरेदी करावयाचे प्रति वस्तु दर दर्शविणारी निविदा सादर करण्यात यावी, सदर निविदेसोबत **निविदाधारकाचे पॅनकार्ड, आधार कार्ड, दुकान असल्यास नोंदणीचा पुरावा सादर करणे आवश्यक राहील.**

६. अनामत रक्कम भरल्यानंतर कक्ष अधिकारी,रोख् शाखा, सामान्य प्रशासन विभाग,तिसरा मजला, मुख्य इमारत, मादाम कामा मार्ग , हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई-४०००३२ यांच्याकडून प्राप्त झालेली पावती निविदा अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. **अनामन रक्कम भरल्याबाबतचा पुरावा सादर केलेला नसल्यास निविदा ग्राहय धरली जाणार नाही.**

७. **निविदा उघडण्याच्या विहित वेळेस दिनांक ३१ डिसेंबर २०२० रोजी सायंकाळी ४.३० वाजता निविदा उघडण्यात येतील.** संबधित निविदाधारकास/प्रतिनिधीस व्यक्तीश: उपस्थित रहाता येईल.

तसेच उपस्थिती नसल्यास सदर निविदा उपस्थित निविदाकार/प्रतिनिधीसमोर उघडण्यात येतील व त्याबाबत अनुउपस्थित निविदाकराची कोणतीही तक्रार चालणार नाही.

८. यशस्वी निविदाधारकास मंजूर निविदा रक्कमेतुन अनामत रक्कम वजा जाता उर्वरित रक्कम कार्यालयीन **एक दिवसात भरणा** करुन साहित्य ताब्यात घेणे आवश्यक राहील. अन्यथा त्याची निविदा रद्दबातल ठरवली जाईल व अनामत रक्कमेस त्यास मुकावे लागेल.

९. यशस्वी निविदाधारकाने निविदेची रक्कम भरणा केल्यानंतर तात्काळ सदर वस्तु आहे त्या ठिकाणाहुन स्वखर्चाने ताब्यात घेणे आवश्यक राहील. त्यासाठी मनुष्यबळ किंवा इतर कोणताही खर्च देण्यात येणार नाही. तसेच निविदा मंजूरी नंतर सदर वस्तुची जबाबदारी निविदाधारकाची राहील.

१०. यशस्वी निविदाधारकास सदर वस्तु वाहतुक करताना/ताब्यात घेताना आवश्यक असलेले शुल्क /कराचा भरणा, अनुषंगीक खर्चाची संपुर्ण जबाबदारी त्यांची राहील.

११. यशस्वी निविदाधारकाने निविदा मंजूरीनंतर कोणत्याही कारणास्तव साहित्य घेण्यास नकार दिल्यास त्याने जमा केलेली अनामत रक्कम जप्त करुन शासन जमा करण्यात येईल व सदर रक्कम कोणत्याही परिस्थितीत परत दिली जाणार नाही.

१२. निविदेबाबत निविदाधारकाची कोणतीही अट स्विकारली जाणार नाही.

१३. कोणतेही कारण न देता निविदा प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर नाकारणे याचे संपुर्ण अधिकार मा.अपर मुख्य सचिव (सेवा),सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय,मुंबई यांनी राखुन ठेवलेले आहेत.

१४. यशस्वी निविदाधारकाने वस्तु ताब्यात घेताना कार्यालयाच्या मालमत्तेचे नुकसान झाल्यास त्याबाबत मालमत्तेच्या नुकसानीची भरपाई द्यावी लागेल.

१५. निर्लेखित केलेले संगणक हे शासकीय कार्यालयातील शासकीय कामकाजाशी संबधित आहेत. त्यामुळे त्यात काही डाटा हार्डडिस्क मध्ये असल्यास तो पुर्णपणे काढुन टकाण्याची जबाबदारी खरेदीदार निविदाधारकाची राहील.

| अ.क्र. | निविदा प्रक्रिया तपशील | कालावधी |
|---|---|---|
| १ | निविदा प्रसिध्द झाल्याचा दिनांक (२३ डिसेंबर २०२०) | २३ डिसेबर २०२० ते<br>३१ डिसेंबर २०२० |
| २ | निविदा सादर करण्याचा कालावधी ( कार्यालयीन वेळेत) | दि.२३ डिसेंबर २०२० ते<br>दि. ३१ डिसेंबर २०२०<br>दुपारी २.३० ते ४.०० |
| ३ | विक्री करावयाचे निर्लेखित साहित्य पाहण्याचा कालावधी (कार्यालयीन वेळेत) | दि.३० डिसेंबर २०२०<br>दुपारी २.३० ते ४.०० |
| ४ | निविदा उघडण्याचा दिनांक | दिनांक.३१ डिसेंबर २०२०<br>दुपारी ४..३० |
| ५ | यशस्वी निविदा धारकास संपुर्ण रक्कम भरणा करुन सदर साहित्य ताब्यात घेण्याचा कालावधी ( कार्यालयीन वेळेत) | दि.५ फेब्रुवारी २०२० |

कार्यासन अधिकारी
सामान्य प्रशासन विभाग
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२